# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



जावक क्रमांक :- १९८ दिनांक :- २०/०७/२०२१


## फसवणुक झालेल्या शेतकऱ्याचा माल २४ तासाचे आत परत मिळून देण्यात तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

तक्रारदार नामे श्री. अमोल दगडू पहे वय ३३ वर्षे, धंदा- फळ व्यापार, रा. हंगेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्रमांक I ८८४/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४२० प्रमाणे दाखल करण्यात आला होता. यातील आरोपीताने तक्रारदार यांना अहमदनगर येथून एकुण ११२ कॅरेट डाळींब एकुण किंमत ८७,८०० रुपये चे घेऊन बोलविले व ते स्वत:कडे घेऊन पैसे न देता फसवणुक करुन निघून गेला. तक्रारदार हे शेतकरी असून त्यांची तात्काळ दखल घेण्यात येऊन आरोपीताचा व फिर्यादी यांचे संभाषणाबाबत तांत्रीक विषलेशन करुन आरोपीताचा शोध घेण्यात आला.

शेतकऱ्याची फसवणुक करुन गुन्हयातील एकुण ११२ कॅरेट डाळींब वसई रेल्वे स्टेशनच्या पुर्वेस असलेल्या पार्कीगमध्ये आरोपी प्रकाश उमेश चौधरी वय २५ वर्षे याने लपऊन ठेवले होते. आरोपीतास ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्हे प्रकटीकरण पथकाने कौशल्यापुर्ण तपास करुन गुन्हयातील संपुर्ण माल जप्त करण्यात आला. सदरचा गुन्हा २४ तासाचे आत उघडकीस आणुन शेतकऱ्याला त्याचे कष्टाचा माल परत मिळून देण्यात तुळींज पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण पथकास यश प्राप्त झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ -२, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. संदेश पालांडे, मिथून म्हात्रे, पोउपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहा.पोउपनि. बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, पोहवा/ अनिल शिंदे, पो.ना./आनंद मोरे, उमेश वरठा, पो.शि./ अशपाक जमादार, छपरीबन यांनी केलेली आहे.

-----oooo-----

